Government of Maharashtra

MAGNETIC MAHARASHTRA

CONVERGENCE 2018

Global Investors Summit - Feb 18-20

# एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करताना विकासकांना सोयी सवलती देण्याबाबत

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## उद्योग विभाग

Government of Maharashtra

# एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करताना विकासकांना सोयी सवलती देण्याबाबत – 2018

**प्रस्तावना :–**

राज्याच्या विशेष नागरी वसाहत धोरणाप्रमाणे एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (आयआयए)ला प्रोत्साहन देण्यासाठी सुसंगत बदल व प्रोत्साहने देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**1. एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता क्षेत्रफळ किमान मर्यादा शिथील करणे :–**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित होण्यास पात्र होण्यासाठी किमान क्षेत्रफळ 40 हेक्टर (100 एकर) असावे ही अट जागेवरील परिस्थीती, जमीन संपादनास येणाऱ्या अडचणी, सलगतेने उपलब्ध होणारे क्षेत्र, जागेची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन किमान क्षेत्रफळ 20 हेक्टर (50 एकर) पर्यंतच्या क्षेत्रास शिथीलता देण्याचे अधिकार हे सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीस याद्वारे देण्यात येत आहेत.

**2. पोहच रस्ता :–**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित होण्यास पात्र होण्यासाठी किमान 24 मीटर रुंदीचा प्रवेश रस्ता उपलब्ध असावा हि अट जागेवरील परिस्थीती, उपलब्ध असलेला पोहच मार्ग, पोहच मार्ग उपलब्ध होण्यासाठी जमीन संपादनामध्ये येणाऱ्या अडचणी, जागेची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन किमान 12 मीटर पर्यंत रुंदीच्या प्रवेश रस्त्यास शिथीलता देण्याचे अधिकार हे सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीस याद्वारे देण्यात येत आहेत.

**3. मुद्रांक शुल्क माफी :–**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या जमिनीवर विकासकास 50 टक्के पर्यंत मुद्रांक शुल्क माफी देण्यात येत आहे. विशेष नगर वसाहत प्रकल्पाकरीता मुद्रांक शुल्क माफीबाबत नगरविकास विभागाकडून बदल/सुधारणा केल्यास त्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहतील.

**4. सरकारी क्षेत्र हस्तांतरण :–**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करताना संपादित क्षेत्राच्या सलगतेसाठी विकासकास सरकारी क्षेत्राची आवश्यकता असल्यास व सदर सरकारी क्षेत्र निर्बाध्य असल्यास सदर क्षेत्र महसूल विभाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्रचलित धोरणानुसार वर्ग करेल. प्रस्तुत क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ बाजारमुल्याच्या दरानुसार विकासकास एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता वाटप करण्याची कार्यवाही करेल. सदरचे क्षेत्र हे एकात्मिक औद्योगिक क्षेत्राचाच भाग राहील.

**5. वीज पुरवठा :–**

एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील सर्व उद्योग घटकांची अथवा काही उद्योग घटकांची विजेची गरज 1 मेगावॅटपेक्षा जास्त असल्यास त्याठिकाणी विकासक स्वत:च्या खर्चाने सबस्टेशन उभारून मुक्त प्रवेशाद्वारे (Open Access) अन्य वीज पुरवठादाराकडून वीज खरेदी करू शकेल व प्रस्तुत ॥ क्षेत्रातील उद्योग घटकांना वीजपुरवठा करण्याची त्यास मुभा असेल. तसेच एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील विकासक/उद्योजकास स्वत: विद्युत निर्मिती (Captive Power Generation) करण्याची मुभा राहील.

**6. अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) :–**

नगरविकास विभागाच्या दिनांक 26.12.2016 च्या अधिसूचने मध्ये विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी अनुज्ञेय करण्यात आल्याप्रमाणे एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता चटई क्षेत्र व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) अनुज्ञेय राहिल. त्यानुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ज्या ज्या वेळी प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून बदल/सुधारणा केल्या जातील ते बदल/सुधारणा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहतील.

**7. विकास शुल्कामध्ये सवलत :–**

नगरविकास विभागाच्या दिनांक 26.12.2016च्या अधिसूचने मध्ये विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी विकास शुल्कामध्ये 50 टक्के सवलत देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्कामध्ये विकासकास 50 टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात येत आहे. ज्या ज्या वेळी प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून बदल/सुधारणा केल्या जातील ते बदल/सुधारणा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहील.

प्रस्तुत सवलती शासकीय संस्था/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/सिडको यांच्याकडून प्राप्त जमिनीवर स्थापित विशेष आर्थिक क्षेत्रामधून विनाअधिसूचित होऊन स्थापन झालेल्या/होणाऱ्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास लागू राहणार नाही.

Government of Maharashtra

## DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

## DIRECTORATE OF INDUSTRIES

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

## MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

## MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**